आगाऊ ताबा आदेश

क्रमांक/कक्ष-२६/अका/महसूल/कावि- ४३ /२०१९
जिल्हाधिकारी, अमरावती यांचे कार्यालया
दिनांक २९/१ /२०१९

विषय :- मौजा पाटीया ल.पा.प्रकल्प धारणी
राजस्व जमीन जलसंपदा विभागास हस्तांतरीत करण्याचा ई वर्ग जमिनीचा प्रस्ताव मौजा बासलापूर ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती.

संदर्भ:- १) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन ०५/२०११/प्रक्र ९०/ज-९ दि. १२ जुलै, २०११.
२) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन ०९/२०१२/प्रक्र ७९/ज-१/ दिनांक ३०/११/२०१२
३) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन-२०१५/प्रक्र-४५/ज-१ दि. १ जून, २०१५.
४) महसूल व वन विभाग, शासन निर्णय क्रमांक जमीन-२०१५/प्रक्र-४५/ज-१ दि. १ जून, २०१७.
५) उपविभागीय अधिकारी, चांदूर रे यांचे पत्र क्रमांक/शिरदा/ ज.प/कावि-६६०/२०१८ दिनांक - २९/१०/२०१८.

ज्याअर्थी मौजा बासलापूर ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती येथील ई क्लास गट नं ६० एकुण क्षेत्र १३.३९ हे.आर पैकी ९.३३ हे.आर शेत जमीन वनीकरणाकरीता भुसंपादन करण्याबाबत प्रस्ताव संदर्भ क्र ५ अन्वये उपविभागीय अधिकारी, चांदूर रे मार्फत सादर करण्यात आला आहे.

ज्याअर्थी सदर प्रकरणात उपविभागीय अधिकारी, चांदूर रे यांचे अहवालाप्रमाणे मौजा बासलापूर ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती येथील ई क्लास गट नं ६० एकुण क्षेत्र १३.३९ हे.आर पैकी ९.३३ हे.आर जागा वन विभागास देण्याबाबत दिनांक २३/०३/२०१८ रोजी जाहिरनामा प्रसिध्द केला आहे. जाहिरनामा प्रसिध्दीनंतर विहीत मुदतीत कोणाचाही आक्षेप अथवा हरकती प्राप्त झाल्या नाहीत. उक्त जागेकरीत विविध शासकीय विभागाच्या हरकती/अभिप्राय मागविण्यात आला. त्यानुसार तलाठी/ मंडळ अधिकारी यांचे अहवालामध्ये नमूद केल्याप्रमाणे उक्त जमीन संबंधीत विभागास दिल्यानंतर ५% पेक्षा जास्त गायरान जमीन शिल्लक राहते.

ज्याअर्थी उक्त जागेकरिता सहाय्यक संचालक, नगर रचना अमरावती यांनी जा.क्र जागा मागणी/ /मौ. बासलापूर/ता.चा.रे/जि.अम/ग.नं-६०/ससंनर-अम/१२६५ दिनांक ०६/०७/२०१८ अन्वये मौजा बासलापूर ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती येथील ई क्लास गट नं ६० एकुण क्षेत्र १३.३९ हे.आर पैकी ९.३३ हे.आर जागेकरीता उक्त विभागाला काही अटी/ शर्तीवर मान्यता प्रदान केली आहे. उपअधिक्षक, भुमी अभिलेख चांदूर रे यांनी उक्त प्रकरणी 'क' प्रत सादर केली आहे. प्रकरणात संलग्न केली आहे. वैद्यकिय अधिक्षक ग्रामिण रुग्णालय, चांदूर रे

Scanned by CamScanner

यांनी उक्त जागेकरीता नाहरकत सादर केली आहे. तसेच उक्त जागेकरिता महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण महामंडळ कंपनी मर्या यांनी दिनांक ०४/०५/२०१८ अन्वये नाहरकत सादर केली आहे. उक्त जागेकरिता ग्रामपंचायत मासिक सभा ठराव दिनांक २७/७/२०१८ व ग्रामसभा ठराव दि ५/९/२०१८ ठरावास मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद अमरावती यांनी क्र/जिप/पंचायत/राजस्व/१०५००/२०१८ दिनांक ९/१०/२०१८ नुसार मान्यता प्रदान केली आहे.

ज्याअर्थी दुय्यम निबंधक श्रेणी चांदूर रे यांनी मौजा बासलापूर ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती येथील ई क्लास गट नं ६० एकुण क्षेत्र १३.३९ हे.आर पैकी ९.३३ हे.आर जागेकरीता ५२,२४,८००/- इतके मुल्यांकन कळविले आहे.

त्याअर्थी मौजा बासलापूर ता. चांदूर रेल्वे जि. अमरावती येथील ई क्लास गट नं ६० एकुण क्षेत्र १३.३९ हे.आर पैकी ९.३३ हे.आर उपवन संरक्षक, अमरावती वन विभाग, अमरावती यांना महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम १९६६ चे कलम ३०, कलम ४० तसेच महाराष्ट्र जमीन महसुल अधिनियम (शासकीय जमीनीची विल्हेवाट लावणे) नियम १९७१ च्या नियम ५ व ६ मधील तरतुदी नुसार व शासन निर्णय क्रमांक जमीन ०९/२०१२/प्रक्र ७९/ज-१/दिनांक ३०/११/२०१२ मधील तरतुदी नुसार राज्य शासनाच्या प्रशासकीय विभागांना जमीनीची खरीखुरी आवश्यकता (Bonafide Area Requirement) विचारात घेऊन व महसूल व वन विभागाचे शासन निर्णय क्रमांक जमीन-२०१५/प्रक्र -४५/ज-१, दिनांक १/०६/२०१५ अन्वये जिल्हाधिकारी, अमरावती या नात्याने प्रदान केलेल्या अधिकारान्वये **उक्त रक्कम शासन खजिन्यात जमा करण्याचा तथा** खालील अर्टी व शर्तीवर अधिन राहून आगाऊ ताबा प्रदान करण्यात येत आहे.

**अर्टी व शर्ती :-**

१) उपरोक्त विषयांकित जमीन **उपवन संरक्षक, अमरावती वन विभाग, अमरावती** हे भोगवटदार वर्ग-२ म्हणुन धारण करतील व शासनाच्या महसुल व वनविभागाच्या पूर्व परवानगी शिवाय हस्तांतरण/गहाण/तारण/ किंवा बक्षीस करणार नाहीत.

२) जमिनीचा वापर मंजूर प्रयोजनासाठी करण्यात यावा अन्यत्र कोणत्याही प्रयोजनासाठी शासनाच्या महसुल व वनविभागाच्या पुर्व परवानगी शिवाय जमिनीचा वापर करता येणार नाही.

३) जमिनीची मोजणी करुन **उपवन संरक्षक, अमरावती वन विभाग, अमरावती** यांचे ताब्यात देण्याची कार्यवाही उपविभागीय अधिकारी /तहसिलदार यांनी करावी. भुखंडाचे कोणत्याही परिस्थितीत विभाजन करता येणार नाही.

४) उपविभागीय अधिकारी, चांदूर रे यांनी जमिनीचा ताबा देण्यापुर्वी सहाय्यक संचालक, नगर रचना अमरावती यांनी घ्यातलेल्या अर्टी व शर्ती मान्य, असल्यास ताबा देण्यात यावा.

५) उपविभागीय अधिकारी, चांदूर रे यांनी जमिनीचा ताबा देण्यापुर्वी शासनाच्या अटी व शर्ती मान्य असल्याचे **उपवन संरक्षक, अमरावती वन विभाग, अमरावती** हया भोगवटदार कडुन लेखी प्रमाणीत करुन पत्र घ्यावे. व तदनंतरच जमिनीचा ताबा देण्यात यावा.

६) ज्या प्रयोजनाकरिता जमीन मंजुर करण्यात येत आहे तिचा वापर आदेशापासुन एक वर्षाचे आत करणे बंधनकारक राहील.

Scanned by CamScanner

७) ज्या विशिष्ट प्रयोजनासाठी जमीन देण्यात आली असेल त्या प्रयोजनासाटी उक्त जमीन वापरण्यात आली नाही तर किंवा ज्या प्रयोजनासाठी ती देण्यात आली ती विशिष्ट प्रयोजन किंवा प्रयोजना व्यतिरिक्त इतर कोणत्याही प्रयोजनासाठी वापरण्यात आली असेल किंवा राज्य शासनास स्वतःच्या प्रयोजनासाठी किंवा कोणत्याही सार्वजनिक प्रयोजनासाठी ती आवश्यक वाटेल तर उक्त जमीन तिच्यावर बसविण्यात आलेल्या वास्तु व बांधकाम यासह राज्य शासनास परत घेण्यात येईल आणि उक्त जमीन अशाप्रकारे आवश्यक असल्याबद्दलचे संबधित अधिकाऱ्याचे स्वाक्षरीचे प्रमाणपत्र प्रतिग्रहिता व राज्य शासन यांच्यात निर्णयक असेल.

८) उपविभागिय अधिकारी, धारणी यांनी सदर जमिनीची मोजणी करुन तद्नंतर ताबा देण्याची कार्यवाही करावी.

**(ओमप्रकाश देशमुख)**
**जिल्हाधिकारी अमरावती**

**प्रतिलीपी :-**

१. मा अप्पर मुख्य सचिव महसुल व वन विभाग मंत्रालय मुंबई यांना माहिती सविनय सादर.
२. मा.विभागिय आयुक्त अमरावती विभाग अमरावती यांना माहिती करिता सविनय सादर.
३. उपवन संरक्षक, अमरावती वन विभाग, अमरावती यांना माहिती करिता सादर.
४. उपविभागिय अधिकारी, चांदूर रे यांना माहिती करिता. **(सहपत्र :- मुळ प्रकरण)**
**सदर प्रकरणामध्ये आदेशानुसार ताबा देण्याची कार्यवाही पुर्ण करुन परिपुर्ण प्रस्ताव अंतिम मान्यतेकरिता या कार्यालयात सादर करावा.**
५. तहसिलदार, **चांदूर रे** यांना माहिती करिता.
६. **कार्यकारी अभियंता, पाटबंधारे प्रकल्प व जलसंपत्ती अन्वेषण विभाग अमरावती** यांना माहिती करिता.

**जिल्हाधिकारी अमरावती.**

Scanned by CamScanner